दि. ०२/०४/२०२५

# प्रेसनोट

अँन्टी करप्शनच्या पुणे घटकाकडून बी.जे. शासकीय महाविद्यालय, पुणे येथील वरिष्ठ सहायक व कार्यालयीन अधीक्षक यांना लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी ताब्यात घेतलेबाबत.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७, ७ अ. |
| तक्रारदार | पुरुष, वय ३२ वर्ष |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) श्री. जयंत पर्वत चौधरी, वय ४९ वर्ष, पद - वरिष्ठ सहायक (वर्ग-३)<br>२) श्री. सुरेश विश्वनाथ बोनवळे, वय ५३ वर्ष, पद – कार्यालयीन अधीक्षक (वर्ग-३)<br>दोघे नेमणुक - बी. जे. शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, पुणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १,३०,०००/- (एक लाख तीस हजार) रुपये |
| पडताळणी दरम्यान लाच मागणी तडजोडीअंती रक्कम | १,००,०००/- (एक लाख) रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | १,००,०००/- (एक लाख) रुपये |
| पडताळणी दिनांक | ०२/०४/२०२५ |
| सापळा दिनांक | ०२/०४/२०२५ रोजी |
| ठिकाण | बी. जे. शासकीय वैद्यकिय महाविद्यालयाचे कार्यालयात, पुणे |
| तपास अधिकारी यांचे नाव व पद | श्री. प्रसाद लोणारे, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. ९९२३४४४९९८) |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांचा फर्निचर सप्लायरचा व्यवसाय आहे. सदर तक्रारदार यांनी सन २०२३ मध्ये २० लाख रुपये किमतीचे फर्निचर बी. जे. शासकीय महाविद्यालयास दिले होते. तक्रारदाराच्या फर्निचरचे एकूण बिलापैकी दहा लाख रुपयाचे बिल सादर व मंजुर करण्यासाठी लोकसेवक जयंत चौधरी व सुरेश बोनवळे यांनी तक्रारदाराकडे त्या रकमेच्या १३% प्रमाणे १,३०,००० रुपयाच्या लाचेची मागणी केल्याबाबतची तक्रार दि. १/०४/२०२५ रोजी तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दि. २/०४/२०२५ रोजी बी. जे. शासकीय महाविद्यालय कार्यालय, पुणे येथे पंचासमक्ष पडताळणी केली असता, लोकसेवक जयंत चौधरी व सुरेश बोनवळे यांनी तक्रारदाराकडे पंचासमक्ष त्यांचे एकूण बिलाच्या रकमेपैकी दहा लाखाचे बिल मंजूर करण्यासाठी सुरवातीस बिलाच्या रकमेच्या १३% प्रमाणे १,३०,००० रुपयाची लाच मागणी करुन, तडजोडीअंती १,००,००० रुपयाची लाच मागणी करुन, लोकसेवक सुरेश बोनवळे यांनी ती लाच रक्कम लोकसेवक जयंत चौधरी यांचेकडे देण्याबाबत तक्रारदारास सांगितल्याचे निष्पन्न झाले. आज दि. २/०४/२०२५ रोजी लोकसेवक जयंत चौधरी यांनी लोकसेवक सुरेश बोनवळे यांचे सांगणेवरून तक्रारदाराकडून १,००,००० (एक लाख) रुपये लाच रक्कम बी. जे. शासकीय महाविद्यालय, पुणे येथील कार्यालयात पंचासमक्ष स्विकारली असता त्या दोघांना रंगेहाथ पकडण्यात आले असून, त्यांचेविरुद्ध बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कल ७, ७ अ अन्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे अपर पोलीस अधीक्षक विजय चौधरी, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) अँन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
४) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
५) ऑनलाईन अॅप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(दयानंद गावडे)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक, (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.

Scanned with CamScanner